RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक १४० ] शुक्रवार, ऑक्टोबर ३०, २०२६/कार्तिक ८, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४४७**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल विभाग

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगूरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२६.

### अधिसूचना

**खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक गौखनि-१०/०८२६/प्र.क्र.२६०/खनिज-२/ई-१८०४००१.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या कलम ३२८ च्या उप कलम (२) मधील खंड (१९) आणि कलम ३२९ च्या उप कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व निष्कासन) नियम, १९६८ मध्ये सुधारणा करण्यासाठी ज्या नियमांचा पुढील मसुदा तयार करण्याचे प्रस्तावित करत आहे, तो मसुदा सदर संहितेच्या कलम ३२९ च्या उप कलम (१) द्वारे आवश्यक असल्यानुसार, त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुद्यावर महाराष्ट्र शासनाकडून दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ रोजी किंवा त्यानंतर विचार केला जाईल.

२. कोणत्याही व्यक्तीकडून सदर मसुद्याच्या संदर्भात अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीवर किंवा सूचनेवर शासन विचार करेल.

### नियमांचा मसुदा

१. या नियमांस "महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व निष्कासन) (सुधारणा) नियम, २०२६" असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व निष्कासन) नियम, १९६८ च्या नियम ४-अ मध्ये,—

(१) "२०० ब्रास" या अंकांचा व शब्दाचा जेथे जेथे वापर झाला आहे, त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "५०० ब्रास" हे अंक व शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(२) स्पष्टीकरणापूर्वी, खालील परंतुक (Proviso) समाविष्ट केले जाईल, म्हणजेच :—

"परंतु असे की, जेथे वडार समाजातील १० ते ११ सुशिक्षित बेरोजगार व्यक्तींनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या "वडार सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेने" खाजगी जमीन खरेदी केली असेल आणि अशा जमिनीवर महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या तरतुदींनुसार वैध खदान पट्टा (Quarry Lease) मंजूर करण्यात आला असेल, तर अशा सहकारी संस्थेला प्रतिवर्ष जास्तीत जास्त ५,५०० (पाच हजार पाचशे) ब्रास मर्यादेपर्यंतच्या गौण खनिजाच्या उत्खननावरील स्वामित्वधन (Royalty) भरण्यापासून सूट देण्यात येईल";

३. विद्यमान स्पष्टीकरणाचे "स्पष्टीकरण-१" म्हणून पुनर्क्रमांकन करण्यात येईल आणि अशा प्रकारे पुनर्क्रमांकित केलेल्या स्पष्टीकरण-१ नंतर, खालील स्पष्टीकरण जोडण्यात येईल, म्हणजेच :—

"स्पष्टीकरण-२: सदर "वडार सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेची" स्थापना आणि सदस्यत्वाच्या उद्देशासाठी, एकाच वडार कुटुंबातील केवळ एकच बेरोजगार व्यक्ती पात्र असेल व त्यालाच सदस्य म्हणून गृहीत धरले जाईल. कुटुंबातील इतर कोणताही सदस्य, अशा वडार सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेच्या सदस्यासह, या नियमांतर्गत स्वामीत्वधनाच्या (Royalty) लाभासाठी पात्र असणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनिषा जायभाये,**
शासनाचे सहसचिव.

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

## REVENUE DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 30th October, 2026.

*NOTIFICATION*

MINES AND MINERALS (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1957.

No. Gaukhani-10/0826/CR.260/Khanij-2/E-1804001.— The following draft of rules further to amend the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rules, 1968, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by clause (xix) of sub-section (*2*) of section 328 and sub-section (*2*) of section 329 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, for information of all the persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 30th November 2026.

**2.** Any objection or suggestion which may be received by the Additional Chief Secretary to Government of Maharashtra, Revenue Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) (Amendment) Rules, 2026.

2. In rule 4A of the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rule, 1968,—

(1) for the figures and word "200 brass", at both the places where they occur, the figures and word "500 brass" shall be substituted.

(2) before the Explanation, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, where a "Vadar Educated Unemployed Co-operative Society" formed by ten to eleven educated unemployed persons belonging to the Vadar Community purchases private land, and a valid Quarry Lease is granted on such land in accordance with the provisions of the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013, such co-operative society shall be exempted from the payment of royalty on the extraction of minor minerals up to a limit of 5,500 (Five Thousand Five Hundred) Brass per annum.";

(3) the existing Explanation shall be re-numbered as Explanation-1 and after Explanation-1 as so re-numbered, the following Explanation shall be added, namely :—

"Explanation-2 For the purpose of formation and membership of the said "Vadar Educated Unemployed Co-operative Society", only Unemployed one person from a single Vadar family shall be eligible and considered as a member. No other member of the family including member of such Vadar Educated Unemployed Co-operative Society eligible for royalty benefit under this rule.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANISHA JAYBHAYE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.